दै. पुण्य-नगरी, सातारा,वृत्तवेध,दि. २१ नोव्हेंबर २०१२ पान क्र.२

# 'शिपकृपा' दीपस्तंभाची ३० वर्षांची गौरवशाली वाटचाल

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत दीपस्तंभाप्रमाणे आदर्शवत काम करणाऱ्या शिवकृपा सहकारी पतपेढीने संस्थेच्या सर्व सभासद, ठेवीदार यांनी दाखविलेल्या अतूट विश्वास, संस्थेच्या संचालक मंडळाने भविष्यकाळाचा अचूक वेध घेत केलेले नियोजन आणि व्यवसायिक दृष्टीकोनाबरोबरच आधुनिकतेची धरलेली कास त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांनी समर्पित भावनेने दिलेली सेवा या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात स्व. यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असलेला सहकार जोपासत गुरुवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी संस्था ३० वा वर्धापनदिन साजरा करत असल्याची माहिती संस्थेचे विद्यमान अध्यक्ष अविनाश भोसले यांनी दिली.

१९८२ साली स्थापन झालेल्या या संस्थेची यशोगाथा एखाद्या फिनिक्स पक्षाप्रमाणे असून १९८२-१९९० या कालावधीत खडतर प्रवास करणाऱ्या या संस्थेची वाटचाल आता सहकारातील दीपस्तंभ म्हणून गौरवली जात आहे. या संस्थेच्या प्रगतीत संस्थेचे विद्यमान अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी आदींचे मोलाचे योगदान आहे.

व्यवसायिक गतिमानता - संस्थेच्या संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्रात ६३ शाखा व ५ विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून संस्थेचा एकूण व्यवसाय १ हजार २८५ कोटी रुपयांचा असून ठेवी ७०७ कोटी रुपये तर कर्ज ५७८ कोटी रुपये झाली आहे. संस्थेचा मार्च २०१२ अखेर ढोबळ नफा ६ कोटी रुपये आहे.



अविनाश भोसले
अध्यक्ष



हणमंत गायकवाड
उपाध्यक्ष



पंढरीनाथ भोसले
मानद सचिव



कृष्णा शेलार
संस्थापक संचालक



चंद्रकांत वंजारी
संस्थापक संचालक

वसुलीच्या अतिशय महत्त्वाच्या आघाडीवरही संस्थेने उत्तम प्रगती केली असून येणे कर्जाशी थकबाकीचे शेकडा प्रमाण १.१७ टक्के इतके अत्यल्प राखत सहकार कायद्यातील दरवर्षी निकषांची पूर्तता केली आहे. संस्थेत आजमितीस ५०५ कर्मचारी ८८७ ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत.

विविध पुरस्कार सन्मान - शिवकृपा पतपेढी व्यवसायिक व गुणात्मक दर्जा या बाबींवर विविध संस्था व सहकार खात्यामार्फत विविध पुरस्काराने सन्मानित केले आहे. सन २००९ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा संस्थेचा सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था पुरस्कार प्राप्त झाला असून सन २००१ ते सन २००६ या कालावधीत अहवाल स्पर्धेत मुंबई पूर्व उपनगरे फेडरेशनचा पुरस्कार प्राप्त तर राष्ट्रीय सहकाराकरता विकास प्रबंधन संस्था, वर्धा यांचा २००४-०५ या वर्षी उत्कृष्ठ संस्था पुरस्कार बहुमान मिळाला आहे. तसेच संस्थेस सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचा मुंबई विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशनचा आदर्श पतसंस्था पुरस्कार महाराष्ट्र राज्यात सहकार आयुक्त मधुकर चौधरी यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात प्रदान केला आहे.

संस्थेच्या महाराष्ट्रात ६३ शाखांच्या विस्तार असून त्यापैकी ३१ कार्यालये स्वमालकीच्या जागेत कार्यरत आहेत. सर्व शाखांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासकीय कार्यालय तसेच मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, कोरेगाव अशी पाच विभागीय कार्यालय कार्यरत आहेत. तसेच कोरेगाव येथे स्वमालकीच्या जागेत प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित असून त्या माध्यमातून सेवक वर्गास प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे.

सहकार उत्कर्ष - सहकार चळवळ वृद्धींगत व्हावी व ग्राहकांच्या हिताची ठरावी, या विचारधारेनुसार अडचणीतील मार्गक्रमणात विविध पतसंस्थांना मार्गदर्शक व पालकत्वाची भूमिका संस्थेने बजावली असून आर्थिक अवसायानात आलेल्या पतसंस्था यांचे शिवकृपात विलीनीकरण करून ठेवीदारांचे हित व सहकारातील सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

सहकार क्षेत्रातील भरीव कामगिरीबरोबर सामाजिक बांधिलकी जपणे शिवकृपाने आपले आद्य कर्तव्य समजून वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, सार्वजनिक वाचनालये, आषाढी वारीतील वारकऱ्यांना वैद्यकीय मदत, ग्रंथ महोत्सव आयोजनासाठी योगदान, देहू येथील तुकाराम महाराज गाथा मंदिरासाठी आर्थिक सहकार्य, विद्यार्थी दत्तक योजना, दुष्काळी परिस्थिती निवारण्यासाठी टँकरद्वारे पाणी पुरवठा, वृद्धाश्रम मदत इत्यादी स्वरूपात सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

ग्राहक स्नेहसंवर्धन - संस्थेचा व्यवसायाचा गाभा म्हणजे ग्राहक राजा असून त्यांच्या व्यवसायाच्या माध्यमातून सूचना व शुभेच्छा यांचेद्वारे कामकाजामध्ये बदल करून ग्राहकाभिमुख सेवा देता यावी. तसेच संस्थेच्या कार्यप्रणालीची माहिती व्हावी, याकरता संस्था दरवर्षी ऑक्टोबर हा महिना स्नेहसंवर्धन महिना म्हणून राबवित असते.

संस्थेच्या गौरवशाली वाटचालीमध्ये संचालक सखाराम संकपाळ, वसंतराव चव्हाण, भीमराव बोराडे, सोपान बोराडे, बाळासाहेब मोहिते, जयवंत खामकर, अशोक तुपे, बबन काटे, अशोक शिंदे, शिवाजी वरूडे, ॲड. अशोक शिंदे, संचालिका निर्मला ऐवळे, उषा जाधव, कर्मचारी प्रतिनिधी सुनील जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे, अधिकारी, कर्मचारी व ठेव प्रतिनिधी यांचे भरीव योगदान आहे.

– प्रतिनिधी